॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२४ ( प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कला व मानव्यविद्या प्रशाळेच्या वतीने "ट्रान्सफॉर्मेटिव रीइंजिनियरिंग ऑफ करिकुला इन ह्यूमॅनिटीज" या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. आज मंगळवार, दि. २४ मार्च रोजी उद्घाटन सत्रात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर बदलत्या काळातील शिक्षणपद्धती, अभ्यासक्रमातील नवकल्पना आणि कौशल्याधारित शिक्षण यावर या कार्यशाळेत सखोल चर्चा करण्यात आली.

या प्रसंगी कुलगुरू प्रा. व्ही एल माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, नांदेड विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. ए. एम. महाजन, व्यवस्थापन परिषद सदस्य नितीन झाल्टे, कला व मानव्यविद्या प्रशाळेचे संचालक प्रा. रामचंद्र भावसार, वित्त व लेखाधिकारी रवींद्र पाटील यांच्यासह विविध विभागांचे प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यशाळेचे बीजभाषण राज्यसभेचे माजी खासदार विनय सहस्रबुद्धे यांनी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून केले. त्यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमात लवचिकता आणि स्वातंत्र्य मिळाले असल्याचे सांगितले. "भारतामध्ये बेरोजगारीचा प्रश्न नसून कौशल्याधारित शिक्षणाचा अभाव आहे. विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकसित करणारे अभ्यासक्रम राबविणे ही काळाची गरज आहे," असे ते म्हणाले.

जळगाव जिल्ह्यात शेती हा प्रमुख व्यवसाय असल्याने कृषीपूरक कौशल्याधारित अभ्यासक्रम सुरू करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. तसेच पब्लिक पॉलिसी सारखे विषयही अभ्यासक्रमात समाविष्ट करून कला व मानवविद्या शाखेला अधिक बळकटी देता येईल, असे त्यांनी नमूद केले.

उद्घाटनपर भाषणात कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीनंतर शिक्षण क्षेत्रात मोठे बदल घडून येत असल्याचे नमूद केले. "जग वेगाने बदलत आहे. तंत्रज्ञान आणि शैक्षणिक पद्धतीत होणाऱ्या बदलांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये तीन महत्त्वाचे गुण विकसित करणे आवश्यक आहे—गुंतागुंतीच्या जगाला सामोरे जाण्याची क्षमता, समीक्षात्मक विचारसरणी आणि भावनिक बुद्धिमत्ता. हे गुण विकसित झाले तर विद्यार्थी केवळ रोजगारक्षमच नव्हे तर जबाबदार नागरिकही बनतील," असे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी अधिष्ठाता प्राचार्य जगदीश पाटील यांनी स्वागतपर भाषण करत उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. त्यानंतर राजेंद्र नन्नवरे यांनी प्रास्ताविकात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) हे भारताच्या नीतिमूल्यांवर आधारित असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपाली माळी व खेमराज पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. रामचंद्र भावसार यांनी मानले.

त्यानंतर दुपारच्या सत्रात ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ प्राचार्य अनिल राव, आय एम एम अहमदाबाद येथील प्रा. युगांक गोयल, अधिष्ठाता प्रा. जगदीश पाटील यांचे व्याख्याने झाली. उद्या दुसऱ्या दिवशी विशेष व्याख्यान चर्चा सारांश सादरीकरण सामूहिक चर्चा अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

**बातमी नं. २**

जळगाव दि.२४ ( प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव संचलित आदिवासी अकादमी, नंदुरबार आणि पर्यावरण विज्ञान आणि निसर्ग संवर्धन शाळा, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २७ व २८ मार्च २०२६ रोजी "जैवविविधता महोत्सव – २०२६" चे आयोजन करण्यात आले आहे.

सातपुडा–खानदेश प्रदेशातील समृद्ध जैवविविधता, आदिवासी समाजाचे पारंपरिक पर्यावरणीय ज्ञान आणि शाश्वत विकास यांचा परस्परसंबंध अधोरेखित करण्याच्या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. या महोत्सवाचे उद्घाटन समारंभाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. विजय माहेश्वरी हे भूषविणार असून प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्रीमती नीनू सोमराज, वनसंरक्षक, धुळे मंडळ उपस्थित राहणार आहेत. प्रारंभिक भाष्य मा. राजेंद्र नन्नवरे, राज्यपाल नामनिर्देशित व्यवस्थापन परिषद सदस्य हे करणार आहेत.

तसेच या महोत्सवात विषय तज्ञ म्हणून सौ. जुही पेठे (प्रोजेक्ट हेड, रिसर्च इन एन्व्हायर्नमेंट, एज्युकेशन अँड डेव्हलपमेंट सोसायटी, नाशिक), डॉ. निशिकांत काळे (अध्यक्ष, नेचर अँड कन्झर्वेशन सोसायटी, अमरावती), श्री. संजय पाटील (BAIF Development Research Foundation, पुणे) तसेच डॉ. सुधाकर कुर्हाडे (माजी अध्यक्ष, महाराष्ट्र पक्षीमित्र संघटना) हे मार्गदर्शन करणार आहेत.

या महोत्सवात राहुल सोनवणे, अमन गुजर, अधिसभा सदस्य रामसिंग वळवी, अधिसभा सदस्य डॉ जयंत उत्तरवार, पक्षीमित्र अनिल महाजन, अभय उजगरे आदी मान्यवर देखील सादरीकरण करणार आहेत.

या दोन दिवसीय महोत्सवात राज्यभरातील संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी, पर्यावरण अभ्यासक, आदिवासी प्रतिनिधी तसेच निसर्गप्रेमी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. महोत्सवाची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत : जैवविविधता व निसर्ग संवर्धन विषयक तांत्रिक सत्रे व तज्ञांचे मार्गदर्शन, संशोधन पेपर सादरीकरण व शैक्षणिक सुसंवाद, क्षेत्रभेट (Field Visit), "सातपुड्याची लोकधारा" अंतर्गत आदिवासी पारंपरिक नृत्य सादरीकरण, सातपुडा व खानदेशातील जैवविविधतेवरील प्रदर्शनी.

या महोत्सवाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाबाबत जागरूकता वाढविणे व आदिवासी ज्ञानपरंपरेचा प्रसार करणे हा मुख्य उद्देश आहे. सदर महोत्सवाला सर्व संबंधितांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन आदिवासी अकादमीचे संचालक आणि महोत्सवाचे संयोजक प्रा. किशोर पवार यांनी कळवले आहे.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २४ मार्च, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता